माहिती पत्रक

।। शिक्षण आणि सेवा ।।

विसरवाडी एज्युकेशन सोसायटी संचलित,

# सार्वजनिक कला व वाणिज्य महाविद्यालय,विसरवाडी

ता.नवापूर जि.नंदुरबार-४२५४२६


E-Mail Id- vescollege270083@gmail.Com

Web side - www.sacc.ac.in


## स्थापना वर्ष २००१

नॅक पुनर्मूल्यांकीत 'बी' + (२.६) श्रेणी प्रमाणित 2 (F) आणि 12 (B)

विशेष उल्लेखनिय पुरस्कार २०१३(क.ब.चौ.उ.म.वि.जळगांव)




हे माहिती पत्रक विद्यार्थ्यांनी वर्षभर जपून ठेवावे.


प्रकाशक : प्राचार्य डॉ.जयश्री एम.गावीत

# * महाविद्यालयाची ठळक वैशिष्ट्ये *

* गतीमान प्रशासन.
* तज्ञ होतकरू प्राध्यापक वृंद.
* राष्ट्रीय सेवा योजना प्रशिक्षणाची सोय.
* सरकारी व इतर विविध प्रकारच्या फी सवलती व आर्थिक सवलती.
* कमवा व शिका योजना.
* मागासलेल्या विद्यार्थ्यांना सर्व प्रकारच्या सोयी व आर्थिक सवलती.
* स्पर्धात्मक परीक्षा पूर्वतयारी.
* सामान्यज्ञान परीक्षा घेण्याची सोय
* व्यक्तिमत्व विकासाची संधी
* विविध विषयांचे परिसंवाद व चर्चासत्रांचे आयोजन
* वक्तृत्व स्पर्धा,वादविवाद स्पर्धा, निबंध स्पर्धा,
  रांगोळी स्पर्धा,हस्ताक्षर स्पर्धा इ.विविध स्पर्धांचे आयोजन.
* महाविद्यालयाजवळ एस.टी.स्टँड.
* मान्यवरांची शैक्षणिक गुणवत्तेवर आधारित जाहिर झालेली पारितोषिके.
* संगणकीकृत कार्यालय.
* संगणक कोर्सेसची सोय

**वाढदिवस पुस्तक भेट योजना–** वि.ए.सो. चे सर्व मा. पदाधिकारी, प्राचार्य, कर्मचारी, विद्यार्थी, पालक व परिसरातील शिक्षणप्रेमी नागरीक यांच्यातर्फे आपल्या किंवा आपल्या प्रिय व्यक्तींच्या वाढदिवसी दरवर्षी कमीत कमी एक पुस्तक सार्वजनिक कला व वाणिज्य महाविद्यालयच्या ग्रंथालयास भेट देण्याची योजना १ जुन २०१५ पासुन सुरु झाली आहे, सहभाग नोंदवा.

# सार्वजनिक कला आणि वाणिज्य महाविद्याल

विसरवाडी ता.नवापूर जि.नंदुरबार

महाविद्यालय परिचय,

दुर्गम व दऱ्या खोऱ्यातील आदिवासी समाजाची शैक्षणिक गरज लक्षात घेऊन, संस्थेचे माजी अध्यक्ष आरणीय दादासाो.माणिकरावजी होडल्या गावीत(माजी केंद्रीय राज्य मंत्री,सामाजिक न्याय विभाग भारत सरकार) यांनी विसरवाडी एज्युकेशन सोसायटी संचलित सार्वजनिक कला आणि वाणिज्य महाविद्यालय जून २००१ मध्ये स्थापन केले.

मा.दादासाहेब माणिकरावजी गावीत यांनी संस्थेच्या अध्यक्षपदाची धुरा आपले सुपूत्र मा.श्री.भरतभाऊ माणिकरावजी गावीत यांच्याकडे सोपविली. महाविद्यालय शैक्षणिक वर्ष २००४–०५ पासून मा.दादासाहेबांच्या प्रयत्नाने अनुदानित झालेले आहे. मा.दादासाहेबांच्या शुभाशिर्वादाने व मा.भरतभाऊ माणिकरावजी गावीत यांच्या प्रयत्नाने महाविद्यालयाची विकासाकडे वाटचाल सुरू आहे. महाविद्यालय नॅक समितीने पुणर्मूल्यांकनात 'B+'(2.6) दर्जा देऊन नामांकित केले आहे. तसेच महाविद्यालयाला यु.जी.सी. नवी दिल्ली तर्फे २(F) आणि 12 (B) दर्जा प्राप्त झाला आहे. महाविद्यालयाची स्वातंत्र इमारत असुन ती सार्वजनिक शैक्षणिक संकुलात असल्याने शैक्षणिक वातावरणाला एक वेगळा रंग जाणवतो या संकुलातील शैक्षणिक वातावरण शिक्षणासाठी अत्यंत पोषक असे आहे.

महाविद्यालयात कला शाखे अंतर्गत पदवी स्तरावर वेगवेगळे विषय शिकवले जातात. तसेच विद्यार्थ्यांचा सर्वांगीण व्यक्तिमत्व विकाससाठी व आधुनिक काळातील स्पर्धेला विद्यार्थी सामोरे जाऊ शकेल; अशी त्यांच्यात क्षमता येण्यासाठी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन विभाग कार्यरत आहे. व्यक्तिमत्व विकासाठी एन.एस.एस.,खेळ,वाद–विवाद, वक्तृत्व,कला मंडळ,कमवा व शिका इत्यादी अनेक विभाग कार्यरत आहेत.

अभ्यास व अभ्यासेतर क्षेत्रात अग्रेसर अशा नावलौकिक क.ब.चौ.उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील या महाविद्यालयात आपण प्रवेश घेत आहात त्याबद्दल आपले हार्दिक स्वागत !.

महाविद्यालयातील विविध अभ्यासक्रम :– पदवी कला शाखा(बी.ए.)

सामान्य स्तरावरील विषय :– इंग्रजी(सक्तीचे), मराठी,हिंदी,इतिहास,अर्थशास्त्र,

राज्यशास्त्र,समाजशास्त्र,भूगोल,पर्यावरणशास्त्र,सामान्यज्ञान

विशेष स्तरावरील विषय :– मराठी,हिंदी,इतिहास,अर्थशास्त्र

महाविद्यालय प्रवेश पूर्तता :–

विद्यापीठाचे परिपत्रक क्र. ३९ /१९५ अन्वये शैक्षणिक वर्ष १९९५–९६ पासून प्रथम वर्ष कला वर्गाचे सर्व प्रवेश गुणवत्तेनुसार देण्यात येत असून बारावी परिक्षेचा निकाल लागल्या तारखेपासून वीस दिवसाचे आत महाविद्यालयात प्रवेशासाठी अर्ज करावा लागेल. नंतरच्या पाच दिवसात गुणवत्ता यादी महाविद्यालयाच्या सूचना फलकावर लावण्यात येईल. प्रवेशासाठी खालीलप्रमाणे आरक्षण राहील.

(उ.म.वि. परिपत्रक क्र.५०/९५ नुसार) (१) अ. जा. व बौध्द धर्मांतरीत १३%

२) अ. जमाती २२% ३) विमुक्त जाती व भटक्या जमाती ३%

अ. विमुक्त जाती व तत्सम १४ जाती ३%

ब. भटक्या जमाती व जानेवारी ९० पूर्वीच्या दोन टक्के तत्सम जमाती २.५%

क. भटक्या जमाती वंजारी आणि धनगर व तत्सम २%

४ ) इतर मागासवर्गीय जाती १९%

५) अपंग विद्यार्थ्यांसाठी आरक्षण खुल्या प्रवर्गातील ५0% व राखीव प्रवर्गातील ५0% जागा अंतर्गत स्वतंत्रपणे ३% आरक्षण लागू राहील.

६ ) प्रवेश प्रक्रियेनंतर काही जागा रिक्त राहील्या तर त्या जागांवर एकूण प्रवेश क्षमतेच्या २% पर्यंत विशेष मागास प्रवर्गातील (एस.बी.सी.) विद्यार्थ्यांना गुणवत्तेनुसार प्रवेश देण्यात येईल.

७) सक्रीय सेवेत असलेल्या सैनिक/माजी सैनिक यांचे करिता विहीत करण्यात आलेल्या २% आरक्षण अंतर्गत प्रवेश विद्यापीठाचे परिपत्रक ९/२00५ दिनांक 0२/0३/२00५ नुसार देण्यात येईल.

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या नियमानुसार प्रवेश प्रक्रिया पूर्ण केली जाईल. प्रवेश अर्जासोबत पुढीलप्रमाणे मूळ कागदपत्र व त्याच्या साक्षांकित छायाप्रती जोडणे आवश्यक आहे. अपूर्ण भरलेले तसेच उशिरा आलेले अर्ज यांचा विचार केला जाणार नाही.

**प्रवेशासाठी अत्याश्यक कागदपत्रे (तीन प्रतीत )**

१) शाळा सोडल्याचा दाखला मूळ प्रत व झेरॉक्स २)इ.१२ वी गुणपत्रक व प्रमाणपत्र झेरॉक्स

३) इ. १० वी गुणपत्रक व प्रमाणपत्र झेरॉक्स.

४ ) स्थलांतर दाखला (दुसऱ्या महाविद्यालयातून या महाविद्यालयात प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता. ५) जातीचा दाखला झेरॉक्स.

६) जे विद्यार्थी शिष्यवृत्ती धारक असतील त्यांनी प्रवेश घेतांना पुढील कागदपत्र कार्यालयात जमा करावीत.

अ) आदेश क्रमांक ब) उत्पन्नाचा दाखला

७) शैक्षणिक गॅप असल्यास गॅप सर्टीफिकेट.

८) रक्तगट तपासणी प्रमाणपत्र

**६० + ४० गुणांच्या पात्रता बाबत नियम :-**

१) ६० व ४० गुणांची परीक्षा स्वतंत्र होईल

२) ६० गुणांच्या परीक्षेस उत्तीर्ण होण्यासाठी किमान २४ गुण आवश्यक आहेत.

३) ४० गुणांच्या परीक्षेत उत्तीर्ण होण्यासाठी किमान १६ गुण आवश्यक आहेत.

४) प्रत्येक विषयात उत्तीर्ण होण्यासाठी १०० गुणांपैकी किमान ४० गुण मिळणे आवश्यक आहे.

**A.T.K.T. संदर्भातील नियम :-**

प्रथम व द्रितीय वर्ष कला वर्गासाठी अंतर्गत परीक्षा ०२ व बहिःस्थ परीक्षा ०२ विषयात अनुर्त्तीर्ण असणारा विद्यार्थी पुढील वर्गात प्रवेश घेण्यास पात्र राहील.

**पर्यावरण जाणीव जागृती कोर्स परीक्षा :-**

प्रथम वर्ष कला विद्यार्थ्यांसाठी पर्यावरण जाणीव जागृती हा जादा अनिवार्य कोर्स विद्यार्थ्यांमध्ये व पर्यायाने समाजामध्ये पर्यावरणासंबंधी जाणीव जागृती व्हावी या उद्देशाने क.ब.चौ.उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने सुरु केलेला आहे. हा पेपर एकूण १०० गुणांचा असेल त्या पैकी ४० गुण हे क्षेत्रीय अभ्यासासाठी व उर्वरीत ६० गुणांची लेखी परीक्षा आहे. या परीक्षेत उत्तीर्ण होण्यासाठी किमान ४० गुण मिळणे आवश्यक आहेत. हा विषय उत्तीर्ण झाल्याशिवाय संबंधीत विद्यार्थ्यांला पदवी प्रदान केली जाणार नाही.

**कमवा व शिका :-** स्वतःच्या पायावर उभे राहून शिक्षण घेवू इच्छिणाऱ्या गरीब व होतकरु विद्यार्थ्यांसाठी कमवा आणि शिका योजना क.ब.चौ.उमविच्या परिपत्रकानुसार राबविण्यात येईल. महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २००८-०९ पासून ही योजना सुरु आहे.

**राष्ट्रीय सेवा योजना :-** महाविद्यालयाला शैक्षणिक वर्ष २००५-०६ पासून क.ब.चौ.उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने राष्ट्रीय सेवा योजना चे युनिट सुरु करण्यास परवानगी दिली असून त्यात ११० (एकशे दहा) विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो. दोन वर्ष एन.एस.एस. मध्ये सहभाग व एक वेळा शिबीर केल्यानंतर

विद्यार्थी एन.एस.एस. प्रमाणपत्रास पात्र ठरतो. तसेच दोन वर्षात २४० तास समाधानकारक काम केलेल्या व ०७ दिवसांचे विशेष शिबीर पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांला विद्यापीठाच्या १६३ नियमाचा अंतर्गत खेळाडु आंतर विद्यापीठ –१० प्रोत्साहन गुण मिळतात त्यातुन ५५ विद्यार्थ्यांची निवड विशेष शिबीरास केली जाते.

**ग्रंथालय विभाग :–** बुक बँक योजनेत विद्यार्थ्यांना त्यांची सर्व क्रमीक पुस्तके १/३ रक्कम घेऊन वर्षभर वापरासाठी दिली जातात. या योजनेतून दिलेली पुस्तके विद्यार्थ्यांनी त्यांची वार्षिक परीक्षा संपल्यावर आठ दिवसाच्या आत ग्रंथालयात जमा करणे आवश्यक आहे. अन्यथा त्यांना दंड आकारण्यात येईल.

**प्रथम वर्ष कला विषय :– (CBCS) पॅटर्न अंतर्गत ग्रूप ५**

१) इंग्रजी (अनिवार्य) २) राज्यशास्त्र ३) हिंदी (४) मराठी

७) समाजशास्त्र (५) इतिहास ६) अर्थशास्त्र ६) भुगोल ८) पर्यावरण (अनिवार्य)

वरील पैकी कोणतेही ७ विषय प्रथम वर्ष करिता घेणे बंधनकारक आहे. पण याबाबत प्रवेश समिती अंतिम निर्णय घेईल.

**द्वितीय वर्ष कला:– (CBCS) पॅटर्न**

१) इंग्रजी (अनिवार्य) २) विशेष विषय निवडतांना तो प्रथम वर्षाला अभ्यासलेला असावा.

(१) मराठी २) हिंदी ३) इतिहास ४) अर्थशास्त्र

३) सामान्य (जनलर) विषय १) समाजशास्त्र २) राज्यशास्त्र ३) भूगोल वरील पैकी कोणतेही ०२ विषय घेणे बंधनकारक आहे. पण याबाबत प्रवेशसमिती अंतिम निर्णय घेईल.

४) सामान्यज्ञान (General Knowledge) सर्वांसाठी हा विषय आवश्यक आहे.

**तृतीय वर्ष कला:–**

१) इंग्रजी (अनिवार्य) २)विशेष (स्पेशल)– ३ विशेष(स्पेशल)–४ (३) द्वितीय वर्षात सामान्य (जनरल) स्तरावर घेतलेले विषय तृतीय वर्षासाठी सामान्य(जनरल) म्हणून विषय घ्यावे लागतील.

*** विद्यापीठ मान्यतेनुसार शैक्षणिक वर्ष २०१३–१४ पासुन बी. ए. कला प्रथमवर्षासाठी २२०, द्वितीय वर्षासाठी १२० व तृतीय वर्षासाठी १२० विद्यार्थाना प्रवेश देण्यात येईल. कृपया आपला प्रवेश लवकर निश्चीत करावा.**

**वरील प्रवेश प्रक्रिया संदर्भातील अंतिम निर्णय प्रवेश समितीचा राहील.**

## कला शाखेत ६०+४० परीक्षा (CBCS) पॅटर्न

शैक्षणिक वर्ष २०१८ ते २०१९ पासून प्रथम वर्ष,द्वितीय व तृतीय कला वर्गांसाठी ६०+४० (**CBCS**) पॅटर्न पध्दत सुरू करण्यात आली आहे.

१) प्रत्येक सत्रात २० गुणाच्या दोन चाचण्या घेण्यात येतील.

२) तसेच महाविद्यालयातील विद्यार्थांना शिस्त आणि हजेरी संदर्भात अंतर्गत गुणांसाठी मूल्यमापन केले जाईल.

*** द्वितीय वर्ष कला वर्गात प्रवेश घेतांना प्रवेश अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे.**

१) प्रथम वर्ष गुणपत्रक झेरॉक्स

२) शैक्षणिक गॅप असल्यास गॅप प्रमाणपत्र

३) इ. १२ वी गुणपत्रक व प्रमाणपत्र झेरॉक्स.

४) स्थलांतर दाखला.

(५) इ.बी.सी., पी.टी.सी. व इतर सवलतीचा अर्ज.

**तृतीय वर्ष कला वर्गात प्रवेश घेतांना अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे**

१) प्रथम व द्वितीय वर्ष गुणपत्रक झेरॉक्स.

२) शैक्षणिक गॅप असल्यास गॅप प्रमाणपत्र.

३) इ.बी.सी., पी.टी.सी. व इतर सवलतीचा अर्ज

**विशेष सूचना :–**

**S.C., S.T., O.B.C., E.B.C, N.T,** व इतर सवलत धारक विद्यार्थ्यांनी वेळोवेळी सूचना लागल्यावर सवलतीचे अर्ज महाविद्यालयात देणे आवश्यक आहे.

**महाविद्यालयाचे सर्वसाधारण नियम :-**

१) विद्यार्थ्यांनी नियमित महाविद्यालयात हजर राहिले पाहिजे.

२) विद्यार्थ्यांचा पोषाख उचित व व्यवस्थित असावा.

३) प्रवेश घेतल्यावर प्रत्येक विद्यार्थ्यांला एक ओळखपत्र देण्यात येईल. विद्यार्थ्यांनी दररोज ओळखपत्र स्वतःजवळ ठेवावे. ओळखपत्र तपासणीसाठी मागीतले असता विद्यार्थ्यांने दाखविले पाहिजे..

४) महाविद्यालयाचे कामकाज,प्रतिष्ठा व शिस्त यांना बाधा येईल असे कोणतेही वर्तन विद्यार्थ्यांने महाविद्यालयात करता कामा नये.

५) कोणत्याही विद्यार्थ्यांस प्रक्षोभक व हिंसक अशा जातीय, भाषिक, राजकीय, चळवळीत भाग घेता येणार नाही. तसे केल्यास प्रवेश रद्द केला जाईल.

६) प्रत्येक विद्यार्थ्याने महाविद्यालयाच्या मालमत्तेची योग्य ती काळजी घ्यावी. महाविद्यालयाचा परिसरात गैर वर्तन करणे,दरवाजे, खिडक्या, झाडे यांची मोडतोड करणे, या गोष्टी शिस्ती विरुध्द समजल्या जातील. त्यासाठी दंड आकारला जाईल.

७) वर्ग चालू असतांना कोणत्याही विद्यार्थ्याने महाविद्यालयाच्या परिसरात फिरू नये. किंवा इतर वर्गांना त्रास होईल असे वर्तन करु नये.

८) विद्यार्थ्याने महाविद्यालयाच्या संदर्भात असलेली माहिती वृत्तपत्रात देऊ नये. दिल्यास त्याचा प्रवेश रद्द केला जाईल.

९) प्राचार्यांच्या पूर्व परवानगी शिवाय कोणतेही मंडळ स्थापन करु नये किंवा कोणत्याही व्यक्तीस वक्ता किंवा सभासद म्हणून आमंत्रण देऊ नये. परस्पर वर्गात जाऊन सूचना देण्यास बंदी आहे.

१०) शिस्त भंग करणाऱ्या विद्यार्थ्यास शासन करण्याचा अधिकार प्राचार्यांना राहील.

११) वरील नियमांत बदल करण्याचा व त्यात उल्लेखिलेल्या बाबीसंबंधी निर्णय देण्याचा पुर्ण अधिकार प्राचार्यांना राहील.

१२) महाविद्यालय परिसरात भ्रमणध्वनी वापरने व तंबाखूजन्य वस्तु खाण्यास बंदी आहे.

१३) विद्यार्थ्याने महाविद्यालयीन सूचना फलक वाचण्याची सवय ठेवावी अन्यथा आपले नुकसान झाल्यास महाविद्यालय जबाबदार राहणार नाही.

१४) सर्व विद्यार्थ्यांनी खालील नियम पाळणे आवश्यक आहे. ज्या विद्यार्थ्यांना सरकारी, निमसरकारी अथवा महाविद्यालयीन शिष्यवृती देण्यात येत असेल. त्यांनी खालील नियमांचे पालन करणे आवश्यक आहे.

१) नियमित हजेरी.

२) वर्तणूक व शैक्षणिक प्रगती समाधानकारक असावी.
३) पूर्व सूचनेशिवाय गैरहजर राहू नये.
४ ) विद्यार्थ्याने प्रत्येक विषयाचे स्वाध्याय वेळोवेळी पूर्ण केले पाहिजेत.
(१५) महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांशी विद्यार्थ्यांने सौजन्याने वागले पाहीजे.
१६) एखाद्या विद्यार्थ्यांचे वर्तन महाविद्यालयाच्या हिताच्या दृष्टीने अपायकारक आहे, असे प्राचार्यांचे मत झाल्यास अशा विद्यार्थ्यांस कोणतेही कारण न सांगता महाविद्यालयातून काढून टाकण्यात येईल अथवा अशा विद्यार्थ्यांचा महाविद्यालयातील प्रवेश नाकारला जाईल.
१७) महाविद्यालयाच्या मालकीच्या पुस्तकांची पाने फाडूनये किंवा जाणीवपूर्वक पुस्तके निरुपयोगी करु नये. तसे केल्यास पुस्तकाच्या मुल्याच्या दुप्पट रक्कम वसूल केली जाईल.
१८) ज्या विद्यार्थ्यांची ८०% उपस्थिती व चाचणी परीक्षा उत्तीर्ण असेल अशाच विद्यार्थ्यांचे वार्षिक परिक्षेचे अर्ज भरता येतील.
१९) महाविद्यालयात होणाऱ्या कार्यक्रमांना उपस्थित राहणे आवश्यक आहे.
२०) विद्यापीठाच्या नियमाप्रमाणे प्रथम वर्ष वर्गात शिकणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना वैद्यकिय चाचणी स्वतः करुन घेणे आवश्यक आहे.

**विद्यार्थी कल्याण विभाग :-**

**विद्यार्थ्यांसाठी विविध योजना कर्मवीर भाऊराव पाटील व कमवा आणि शिका योजना**

कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका या योजना पदवी व पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आहेत. तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक, होतकरू व गरजु विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षणासाठी ही योजना आहे. या योजनेचे उद्देश स्वावलंबनाने विद्यार्थ्याला श्रमाची आवड निर्माण करणे, श्रमाची प्रतिष्ठा वाढविणे. स्वयं रोजगारासाठी विद्यार्थ्यांना प्रवृत्त करणे असा मुख्य उद्देश योजनेचे आहे. योजने विद्यार्थ्यांने अध्ययनाच्या वेळेव्यतिरीक्त किमान तीन तास काम करणे अपेक्षित आहे. या योजनेव्दारे विद्यार्थ्यांना आर्थिक लाभ मिळतो.

**साहस कार्यशाळा :-**

विद्यार्थ्यांमध्ये साहसी वृती निर्माण होण्यासाठी या कार्यशाळेत प्रशिक्षण व मार्गदर्शन दिले जाते. संकटांना धैर्याने सामोरे जाणे, मार्ग काढणे, मदत करणे, गिर्यारोहण, रोपवे, पुल बांधणी, रस्ता दुरुस्ती, दिशा ओळख, आकाश निरीक्षण, आत्म संरक्षण व प्रतिकार आणि निसर्ग सहल असे विविध उपक्रम राबविण्यात येत असतात. प्रत्येक महाविद्यालयातील १ विद्यार्थी व १ विद्यार्थिनी या कार्यशाळेत सहभागी होवू शकतात.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर वसतीगृह विद्यार्थी सहायता योजना –**

विद्यापीठाच्या शैक्षणिक प्रशाळा अथवा विभागांमध्ये पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी नियमीत

प्रवेशीत व विद्यापीठाच्या वसतीगृहात निवासीत विद्यार्थ्यांपैकी जे आर्थिकदृष्टीने कमकुवत असलेल्या होतकरु विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर वसतीगृह विद्यार्थी सहायता योजना कार्यान्वित करण्यात आली आहे.

**क.ब.चौ.उ.म.वि.संचलित चाणक्य स्पर्धा परिक्षा:-** विद्यार्थ्यांमधील स्पर्धा परीक्षा कौशल्य वृध्दींगत करणेसाठी व पूर्व तयारीसाठी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठ स्तरावर चाणक्य स्पर्धा परीक्षा एकाच दिवशी आयोजित करण्यात येते. प्रत्येक महाविद्यालय हे परीक्षा केंद्र आहे. ५० पेक्षा जास्त परीक्षार्थी असलेल्या महाविद्यालयांना पूर्व तयारीसाठी स्पर्धा परीक्षा पुस्तकांसाठी अनुदान देण्यात येते. उत्तीर्ण विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्रक देण्यात येतील. स्थानिक महाविद्यालयातील विद्यार्थी कल्याण अधिकारी हे या उपक्रमाचे प्रमुख असतील. तलाठी,पी.एस.आय. तहसीलदार या पदांसाठीच्या स्पर्धा परीक्षेची तयारी या उपक्रमाद्वारे होईल. सदर परीक्षेत महाविद्यालयातील विद्यार्थी सहभागी होवू शकतात.

**उमवि विद्यार्थी दत्तक योजना :-** विद्यापीठ विभागातील विविध प्रशाळा व शैक्षणिक विभाग यातील शिक्षण घेणाऱ्या गरजु व होतकरू विद्यार्थ्यांसाठी विद्यार्थी कल्याण विभागाच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०११-१२ पासुन क.ब.चौ.उ.म.वि. विद्यार्थी दत्तक योजना सुरू करण्यात आली आहे. त्यासाठी १० विद्यार्थी व १० विद्यार्थीनी यांना या योजनेचा लाभ देण्यात येतो.

**सांस्कृतिक गुण कार्यशाळा आयोजन:-** विद्यार्थ्यांना गायन,वादन,नृत्य,नाट्य,सुत्रसंचलन कार्यशाळा या क्षेत्रातील नव्या संकल्पना, तंत्रज्ञान अवगत व्हावे, त्यांची सांस्कृतिक क्षेत्रातील प्रगती व्हावी यासाठी कार्यशाळांचे आयोजन विद्यापीठ स्तरावर विद्यार्थी कल्याण विभाग करते.

**युवती सभा कार्यशाळा आयोजन :-** विद्यार्थी कल्याण विभागामार्फत नियमित शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिंनींकरिता महाविद्यालयीन स्तरावर विशेष स्वरूपाच्या उपक्रमांच आयोजन करणे करीता युवती सभा अंतर्गत, स्वयंसिध्द अभियान व विद्यार्थिंनी व्यक्तिमत्व विकास कार्यशाळा आयोजित करण्यात येते. प्रत्येक कार्यशाळेत महाविद्यालयातील ५० विद्यार्थिनी सहभागी होवू शकतात.

**एकलव्य विद्याधन कर्ज योजना:-** एकलव्य विद्याधन कर्ज योजना ही पदवी व पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या खर्चाच्या ७० टक्के रक्कम कर्ज स्वरूपात आवश्यक त्या कागदपत्रांच्या पुर्ततेनंतर बँकेद्वारे उपलब्ध होते. शिक्षण कर्जासाठी व्याजाचा दर द.सा.द.शे. ११ टक्के असेल. शिक्षण कालावधीमधील खर्चाच्या व्याजाची रक्कम विद्यापीठ कार्यालयाद्वारे अदा केली जाते. ज्या विद्यार्थ्यास प्रवेशित काळात शासकीय/निमशासकीय / सहकारी संस्था/ बँका यांच्याकडून कोणतेही विद्यावेतन / शिष्यवृतती मिळत नसेल. असाच विद्यार्थी या योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्र राहील.

**मा. कुलगुरू वैद्यकीय निधी योजना :-** विद्यार्थी सामुहिक सुरक्षा योजने शिवाय अपघाती/ नैसर्गिक मृत्यु झाल्यास रू.५,०००/- मृत विद्यार्थ्यांच्या पालकास मा. कुलगुरू वैद्यकीय निधीतुन देण्यात येतील. प्रवेशीत विद्यार्थ्यास एखादा गंभीर आजार, अपघाताने जखमी झाल्यास उपचारासाठी योग्य त्या कागदपत्रांची खातरजमा करून सहाय्य करण्यात येते.

## यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक

## (अभ्यास केंद्र सार्वजनिक कला महाविद्यालय ,विसरवाडी)

विसरवाडी एज्युकेशन सोसायटी संचलित, सार्वजनिक कला व वाणिज्य महाविद्यालय, विसरवाडी ता. नवापूर जि.नंदुरबार विसरवाडी सारख्या ग्रामीण व आदिवासी भागात उच्च शिक्षणाचा प्रसार करण्यात अत्यंत मोलाचे कार्य करीत आहे. हे कार्य अधिक चांगले व प्रभावीपणे पार पाडण्यासाठी शै. वर्षे २००९-१० पासून यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ ,नाशिकचे अभ्यास केंद्र महाविद्यालयात सुरू करण्यात आले. या अभ्यास केंद्रात बी.ए. हा शिक्षणक्रम सुरू करण्यात आला असून त्यात मराठी, हिंदी, इंग्रजी, इतिहास, भूगोल, समाजस्त्र, अर्थशास्त्र हे विषय सामान्य(जनरल) स्तरावर सुरू करण्यात आले आहेत. शै. वर्षे २०१० ते २०११ पासुन वरील सर्व विषय विशेष स्तरावर सुरू होतील. या शिक्षण क्रमासाठी प्रवेश पात्रता १० वी नापास / पास ,१२ वी नापास / पास किंवा त्यापेक्षा अधिक कालावधीचा पदविका शिक्षणक्रम पुर्ण कलेल्यांना या विद्यापीठाचा पुर्वतयारी शिक्षणक्रम पूर्ण केल्यास प्रथम वर्षास प्रवेश मिळेल. शै. वर्ष २०१५-२०१६ मराठी, हिंदी, इंग्रजी या तीन विषयात एम.ए. सुरू करण्यात आलेले आहे. यासाठी कोणत्याही विषयातला बी.ए. पदवीधर हा एम.ए. साठी पात्र राहील.

**शारीरिक शिक्षण व खेळ :-** शरीर संवर्धनाच्या दृष्टीने आणि परस्पर सहकार्य आत्मविश्वास धैर्य आणि चिकाटी या गुणांचा विकास व्हावा या हेतूने महाविद्यालयाच्या विस्तीर्ण मैदानावर तज्ञ शिक्षकांच्या देखरेखीखाली खो-खो, कबड्डी, क्रीकेट, व्हॉलीबॉल,फूटबॉल,हॅण्डबॉल इ. मैदानी स्पर्धांची व्यवस्था करण्यात आली आहे.

**सांस्कृतिक शिक्षण :-** अभ्यासाव्यतिरिक्त विद्यार्थ्यांच्या अंगभूत विविध कलागुणांचा विकास व्हावा. त्यांच्या व्यक्तिमत्वाची जडण-घडण व्हावी या उद्देशाने सांस्कृतिक विकासाचे आणि कला विकासाचे कार्यक्रम आखले जातात. शैक्षणिक सहल, वक्त्यांची व्याख्याने, वादविवाद स्पर्धा, परिसंवाद निबंध स्पर्धा इ. अनेक कार्यक्रम तज्ञ प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित केले जातात.

**बक्षिसे व आर्थिक सवलती :-** १) शालांत परिक्षेत शे. ७०% हुन अधिक गुण मिळविणाऱ्या आणि विद्यापीठ परिक्षेत शे. ६०% हून अधिक गूण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यास गुणवत्ता क्रमानुसार शिष्यवृत्ती दिली जाते.

२) वार्षिक परिक्षेत उत्तीर्ण होणाऱ्यांपैकी पहिल्या दोन क्रमांकाच्या विद्यार्थ्यांना बक्षिसे दिली जातील.

(३) अभ्यासू व गरीब होतकरु विद्यार्थी मा. प्राचार्य यांच्या नजरेत आला तर त्यांची पुढील वर्षी फी सवलतीसाठी विचार करण्यात येईल. त्या संदर्भात अंतिम निर्णय प्राचार्य घेतील.

४) मागासलेल्या वर्गातील पालकांचे वार्षिक उत्पन्न ५४०००/- रु पेक्षा कमी आहे. अशा विद्यार्थ्यांची फी सरकारकडून मिळते.

५) याशिवाय वेळोवेळी महाराष्ट्र शासन व केंद्र सरकारने जाहिर केलेल्या सवलती व शिष्यवृत्ती विद्यार्थ्यांना मिळतात. सूचना फलकावर शिष्यवृत्ती माहिती वेळोवेळी लावली जाते व त्यासाठी अर्ज मागविले जातात.

६) आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना अर्थसहाय्य.

७) क.ब.चौ.उ. म. वि. परीक्षेत प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांस अनुक्रमे १०००/ ,७५०/, ५००/ रूपये महाविद्यालयाकडुन रोख बक्षिसीसे दिले जातात.

**ओ.बी.सी. विद्यार्थ्यांयाठी महत्वाच्या सूचना :-**

शिष्यवृत्ती अर्ज भरुन त्यासोबत खालील कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे. अपूर्ण अर्ज विचारात घेतला जाणार नाही. तसेच उचल दिली जाणार नाही.

१) उत्पन्नाचा दाखला. २) जातीचे प्रमाणपत्र

३) गुणपत्रक/मार्कशीट

४) ज्यांच्या पालकांचे उत्पन्न ५४,०००/-(सर्व मार्गांनी) चे आत आहे. त्यांनीच फक्त अर्ज करावा.

५) प्रत्येकाने स्टेट बँकेते खाते उघडावे व खाते नंबर आणून द्यावा. ज्यांची आधी सही होईल. त्यांच्या खात्यावर रक्कम जमा केली जाईल.

६) रु.५४,०००/-च्या वर उत्पन्न असणाऱ्यांनी फी शिफारसीसाठी अर्ज करावा. ठाकुर,टोकरे कोळी, यांनी अर्ज केल्यास त्यंना सवलत मिळेलच याची खात्री नाही.

७) ज्यांच्या शिक्षणात खंड असेल त्यांनी स्टॅम्पवर तसे निवेदन लिहून द्यावे.

८) वडील हेच पालक असल्याने त्यांचेच उत्पन्न मान्य केले जाईल. मात्र वडील हयात नसलयास आईचे उत्पन्न मान्य केले जाईल. त्यासाठी वडील हयात नसल्याचा दाखला जोडावा.

**फी संबंधी माहीती :-**

१) क.ब.चौ.उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या धोरणानुसार महाविद्यालयात फी घेतली जाईल. टर्म

## फी चार्ट २०२ -२०२

| FACULTY | ARTS | | |
|---|---|---|---|
| **PARTICULARS** | **F.Y.B.A.** | **S.Y.B.A.** | **T.Y.B.A.** |
| Tuition Fee | 800 | 800 | 800 |
| College Development Fee | 80 | 80 | 75 |
| Admission Fee | 50 | 50 | 25 |
| Gimkhana Fee | 150 | 150 | 100 |
| Library Fee | 150 | 150 | 125 |
| Alumni Association Fee | 40 | 40 | 25 |
| College Magazine Fee | 60 | 60 | 40 |
| Computer Training Fee | 20 | 20 | 20 |
| Student ID Fee | 30 | 30 | 10 |
| Univarsity Ashvamedha Fee | 30 | 30 | 20 |
| Univarsity Medical Fee | 40 | 40 | 00 |
| Univarsity Student Assistave /Welfare Fund | 60 | 60 | 40 |
| Univarsity Student Insurance Fund | 20 | 20 | 20 |
| Youth Festival Charge | 50 | 50 | 00 |
| Gathering Fee | 60 | 60 | 40 |
| NSS Fee | 10 | 10 | 10 |
| Personality Development & Career Guidance Fee | 50 | 50 | 25 |
| Student Activities Fee | 40 | 40 | 40 |
| Traning & Placement Fee | 20 | 20 | 00 |
| General Knowledge Fee | 0 | 100 | 00 |
| Tutorial & Internal Exam Fee | 100 | 100 | 60 |
| Eligibility Fee | 100 | 00 | 00 |
| Environment Fee | 150 | 100 | 100 |
| Green Energy Fee | 100 | 150 | 100 |
| Misc. Fee | 150 | 150 | 00 |
| Disater Managemnet Fee | 10 | 10 | 10 |
| Flag Fund | 10 | 10 | 10 |
| E-Suvidha Fee | 50 | 50 | 50 |
| Exam Fee Both Sem | 650 | 910 | 1130 |
| Degree Fee | 00 | 00 | 500 |
| Total - | 3080 | 3150 | 3375 |

# *विविध पारितोषिके*

| अं.क्र. | पारितोषिक | अटी व पात्रता | रक्कम(अंदाजे) |
|---|---|---|---|
| १ | विद्यापीठात प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांक आलेल्या विद्यार्थ्यांना | महाविद्यालय तर्फे क्रमश: रूपये देण्यात येतील. | १०००/- ७५०/- ५००/- |
| २ | कै.हेमलताताई वळवी यांच्या स्मरणार्थ प्रा.आर.बी.पाटील यांच्याकडुन प्रथम वर्ष कला वर्गात समाजशास्त्र विषयात प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास २०१/- रु. पारितोषिक- | प्रथम वर्ष कला समाजशास्त्र विषयात सर्व प्रथम | २०१/- |
| ३ | के. हेमलताताई वळवी यांच्या स्मरणार्थ प्रा.आर.बी.पाटील यांच्याकडून द्वितीय वर्ष कला वर्गात समाजशास्त्र विषयात सर्व प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यांस २०१/- पारितोषिक | द्वितीय वर्ष कला समाजशास्त्र विषयात सर्व प्रथम | २०१/- |
| ४ | के.हेमलताताई वळवी यांच्या स्मरणार्थ प्रा.आर.बी.पाटील यांच्याकडुन तृतीय वर्ष कला वर्गात समाजशास्त्र विषयात सर्वप्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास २०१/- रु. पारितोषिक | तृतीय वर्ष कला समाजशास्त्र विषयात सर्व प्रथम | २०१/- |
| ५ | स्वातंत्र सैनिक कै. दगाजी फकीरा शिंदे यांच्या स्मराणार्थ प्रा. अशोक दगाजी शिंदे यांच्या मार्फत | विद्यापीठात प्रथम येणाऱ्या प्रत्येक विषयातील विद्यार्थ्यास | ५००/- |
| ६ | हिन्दी साहित्यीकार सुर्यकांत त्रिपाठी निराला साहित्य लिखाणास प्रेरीत प्रा. एस. आर. राठोड यांच्या कडुन तृतिय वर्ष कला हिन्दी विभागातून सर्वप्रथम येणाऱ्यास १५१/- रु पारितोषिक | तृतीय वर्ष कला हिन्दी विभाग सर्व प्रथम | १५१/- |
| ७ | समाजसुधारक महात्मा जोतीबा फुले यांच्या कार्यप्रेरणेस अनुसरुन प्रा.ए.एम.काळबांडे यांचे कडून तृतीय वर्ष कला इतिहास विभागातून सर्व प्रथम येणाऱ्यास १५१/- रु. पारितोषिक | तृतीय वर्ष कला इतिहास विभाग सर्व प्रथम | १५१/- |
| ८ | कै.तापीबाई शंकर चौधरी यांच्या स्मरणार्थ श्री.शरद श्रीराम चौधरी यांच्या कडून तृतीय वर्ष कला मधुन सर्व प्रथम येणाऱ्यास | तृतीय वर्ष कला सर्व प्रथम येणाऱ्यास | १०१/- |
| ९ | कै.शरद वसंतराव भोसले यांच्या स्मरणार्थ डॉ. विशाल शिवाजीराव करपे यांच्या कडून | उत्कृष्ठ वृक्ष संगोपन करणाऱ्यास | १५१/- |
| १० | प्रा.बी.व्ही.गावीत यांच्या कडून कै.वेलुबाई गावीत यांच्या स्मरणार्थ तृतीय वर्ष कला राज्यशास्त्र विषयात सर्वप्रथम येणाऱ्यास ५०१/- रु. पारितोषिक | राज्यशास्त्र तृतीय वर्ष कला सर्वप्रथम | ५०१/- |

# *विविध पारितोषिके*

| अ.क्र. | पारितोषिक | अटी व पात्रता | रक्कम(अंदाजे) |
|---|---|---|---|
| ११ | श्री.मुलचंद हिरकणे यांच्या स्मरणार्थ प्रा.ए.एम.हिरकणे तर्फे | उत्कृष्ठ ग्रंथपाल उपयोग करता | १०१/- |
| १२ | कै.द्वारकाबाई शंकरशेठ मेटकर यांच्या स्मरणार्थ श्री राज प्रिंटर्स ॲन्ड झेरॉक्स सेंटर,विसरवाडी यांच्या कडून तृतीय वर्ष कला मधुन सर्व प्रथम येणाऱ्यास | तृतीय वर्ष कला सर्व प्रथम येणाऱ्यास | १०१/- |
| १३ | श्रीमती देवईबाई तात्याराव करपे यांच्या स्मरणार्थ प्रा.डॉ.व्ही.एस.करपे यांच्याकडून तृतीय वर्ष कला अर्थशास्त्र विभागातून सर्व प्रथम येणाऱ्यास | अर्थशास्त्र विभाग तृतीय वर्ष कला सर्व प्रथम | २०१/- |
| १४ | कै.मधुकर विश्वनाथ नेवे (भुसावळ) स्मरणार्थ प्रा.सुनिल मधुकर नेवे (भालोद महाविद्यालय) यांच्याकडुन प्रथम वर्ष कला राज्यशास्त्र विषयात प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यांस | राज्यशास्त्र विभाग प्रथम वर्ष कला सर्व प्रथम | १०१/- |
| १५ | जगन्नाथ एकनाथ साळवे यांचा स्मरणार्थ श्री.संजय जगन्नाथ साळवे यांचा कडून | तृतीय वर्ष कला मध्ये प्रथम येणाऱ्यास | २५१/- |
| १६ | कै. दिगंबर तात्याराव करपे यांच्या स्मरणार्थ डॉ.विशाल शिवाजीराव करपे याच्या कडून | बी.ए.अर्थशास्त्र विषयात विद्यापीठातील गुणवत्ता यादीत येणाऱ्या विद्यार्थ्यांना | प्रत्येकी ५०१/- |
| १७ | कै. तात्याराव करपे यांच्या स्मरणार्थ डॉ.विशाल करपे यांच्या कडून अर्थशास्त्र विषयात विद्यापीठात एम. ए. (अर्थशास्त्र) विषयात प्रवेशीत विद्यार्थांचे परीक्षा शुल्क देण्यात येईल. | एम.ए.अर्थशास्त्र विषयात प्रवेशीत | परिक्षा शुल्क |

विद्यापीठ व शासनामार्फत प्रवेश फी / परीक्षा फी बदल झाल्यास बंधनकारक राहिल.

# Sarvajanik Art's & Commerce College

VISARWADI Tal.Navapur Dist.Nandurbar

## Vision

To enhance the standard of living of the tribal people by imparting relevant value based quality education.

## Mission

To bring the tribal communites in the main stream of higher education for their all round development

## Objective

* To acquaint the tribal student with the diffrent career opportunities
* To inculcate interest in education of the tribal student.
* To make them understand the importace of education in their life.
* To develop commuticative and employability skills among the tribal student.
* To make them nation loving, patriotic, self reliant, confident and disciplined citizens.

**(Career and Entrepreneurship Counseling, Skill Development, Internships, Placement,etc.)**

Career Katta is an initiative of Department of Higher and Technical Education, Govt of Maharashtra and in coordination with Maharashtra Information Technology Support Centre. The college conducts various activities to guide students about Career, Competitive Examinations (UPSC, MPSC, Banking. SSB, SSC, Police, LIC, etc.), Entrepreneurship, Skill Development; Credit Earnings under new CBCS and NEP Curriculum Framework, Internship and Placement Opportunities, etc.

**Eligibility to Join:** Any student admitted for any regular course in the college or college or college alumni referred by college Coordinator.

**Registration Fees:** One Time Rs. 365 for Three-year degree period (Rs.0.36 per day), which will be reimbursed in the form of subsidy on examination charges of CBCS. It including free access to all the activities, courses, State Level Competitive Exams, etc.

**How to Register:** Download the MITSC application from Google Play Store and pay fees using any online payment mode

**College Code:** A466 (Please include the Career Katta code of the College)

**Contact:** For more details visit college webpage _________ or contact Coordinator Dr. Prashant Mandlik, Department of Chemistry, 94038 66611 or Career Katta Helpline 7507652555

करियर कट्टा मध्ये विद्यार्थ्यांनी नाव नोंदणी करण्यासाठी

SCAN ME

यूट्यूब वरील उपक्रमांमध्ये सहभागी होण्यासाठी सबस्क्राईब करा

Subscribe me

करियर कट्टा नियमित उपक्रमाची माहिती मिळवण्यासाठी सबस्क्राईब करा

Subscribe me

**हेल्पलाइन नंबर : 750 765 2555**

किंमत रुपये ३०/-

वर्ष तिसरे

# महाराष्ट्र राज्य
# उच्च व तंत्र शिक्षण विभाग
# व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र

यांच्या संयुक्त विद्यमाने

# करिअर कट्टा

युवकांच्या सर्वांगीण विकासासाठी.....

- आयएएस आपल्या भेटीला
  - * राज्य पातळीवरील स्पर्धा परीक्षा/महाराष्ट्र लोकसेवा आयोग
  - * पोलीस भरती
  - * बँकिंग सेवा
  - * स्टाफ सिलेक्शन कमिशन
  - * केंद्रीय पातळीवरील स्पर्धा परीक्षा (यु.पी.एस.सी.)

- उद्योजक आपल्या भेटीला
- भारतीय संविधानाचे पारायण
- पर्यावरण शास्त्र अभ्यासक्रम

ध्येयाच्या
वाटेवर
सातत्याने
३६५
दिवस

सभासद शुल्क
रू. ३६५ (३ वर्षासाठी)
५० कोर्स मोफत

## वैशिष्ट्ये

राज्यातील पदवी प्रथम वर्षाला प्रवेशित सर्व विद्यार्थ्यांसाठी पहिल्या महिन्यात करिअरसाठी शासकीय व खाजगी क्षेत्रातील नोकरीच्या संधी व उद्योजकता विकास हा दोन क्रेडिटचा कोर्स मोफत.

सर्व पद्धतीच्या स्पर्धा परिक्षेची इत्यंभूत माहिती दिली जाते, तसेच अभ्यासक्रम देखील शिकवला जातो.

५० शॉर्ट टर्म कोर्सेस मोफत प्रशिक्षण प्रति महिना पाच कोर्स याप्रमाणे.

एकदा नोंदणी केल्यास १,००० दिवस म्हणजे तीन वर्षे करिअर कट्ट्याचा लाभ घेता येईल.

करिअर कट्टा चॉईस बेस क्रेडिट सिस्टिम अंतर्गत १५ कोर्सची परीक्षा देवून प्रमाणपत्र मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्काच्या सवलतीच्या माध्यमातून ३७५ रूपये परत केले जातात.

नाव नोंदणी व अधिक माहितीसाठी ७५०७६५२५५५ या नंबरवर आपले नाव करा